# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १४.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १३/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५०,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १३/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ५६.७ लिटर दारू असा एकुण ३०,७५०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. १३/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २१९०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.१३/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर, औंढा ना, वसमत ग्रामीण व कळमनुरी येथे अपघाताचे असे एकुण ०४ गुन्हे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १३/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०५ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**दुखापत:—**

दि. १३/०१/२०२३ रोजी पोस्टे कुरूंदा येथे ०१ व पोस्टे गोरेगाव येथे ०१ असे एकुण ०२ गुन्हे कलम ३२४ व ईतर भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.